केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादूर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणींसंदर्भात उपाययोजना व सहाय्य करणे.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण१०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ जुलै, २०२०.

**प्रस्तावना:-**

कोव्हिड-१९ महासाथीचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी केंद्र शासनाच्या गृह विभागाने तसेच राज्य शासनाने मार्गदर्शक सूचना जारी करुन लॉकडाऊन जाहीर केले. आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ नुसार घातलेल्या निर्बंधामुळे बांधकाम साहित्याची वाहतूक, मनुष्यबळ तसेच सल्लागार सेवा यांचेवर मोठया प्रमाणात विपरित परिणाम झाला आहे. त्यामुळे बांधकाम प्रकल्पांची गती मोठया प्रमाणात मंदावली आहे. केंद्र शासनाने कोव्हिड-१९ महामारी ही नैसर्गिक आपत्ती म्हणून ग्रहीत धरुन अनेक शासकीय कंत्राटांमध्ये "दैवी संकट" तरतूद (Force Majeure Clause) वापरण्याचा सूचना दिल्या आहेत. तसेच कामाची मुदत तीन ते सहा महीने एवढी वाढविली आहे. अशा प्रकरणी Performance Security ची रक्कम कंत्राटदारास परत देण्याबाबतची कार्यपध्दती विहित केली आहे.

**शासन निर्णय-**

उपरोक्त विषयाबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

२. राज्यात कोरोना साथीच्या प्रादूर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना सोसाव्या लागत असलेल्या अडचणींसंदर्भात उपाययोजना करणे व त्यांना सहाय्य करणे आवश्यक असून त्यादृष्टीने खालील उपाययोजना करण्यात यावी.

१) शासकीय कामाच्या पूर्णत्वासाठी **मुदतवाढीची** विनंती कंत्राटदाराने केल्यास त्यास दि.१५ मार्च, २०२० ते दि.१५ सप्टेंबर, २०२० अशी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात येईल. या कालावधीसाठी त्याचेवर कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार नाही. मात्र कंत्राटदारास या कालावधीसाठी कोणतेही दावे (Claims) करता येणार नाहीत. भाववाढीसंदर्भात कंत्राटातील अटी व शर्ती लागू राहतील. वरील सुविधा ज्या प्रकरणी दि.१५ मार्च, २०२० पूर्वी निविदा शर्तींचा अन्यथा भंग झाला नसेल अशा कंत्राटांना लागू राहतील.

२) ज्या कामांमध्ये **सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit)** चालू देयकांमधून (RA Bills) मधून करण्यात येते, अशा प्रकरणी प्रत्येक चालू देयकांतून करावयाची वजावट यांचे प्रमाण कमी करुन आणि/ अथवा वजावटीचा कालावधी अधिक देयकांकरीता वाढविण्यात येईल. तथापि, संपूर्ण सुरक्षा अनामत रक्कम वसूल करण्यात येईल. याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**२.१) ज्या कंत्राटांमध्ये मुळ सुरक्षा अनामत (Security Deposit) निविदा रकमेच्या २ टक्के आहे, (RA Bill मधून वसूल करायची रक्कम १% आहे.)**

**(अ)** ज्याप्रकरणी चालू देयकातून वजावट पूर्ण झालेली नाही अशा प्रकरणी वसूल केलेली रक्कम वगळून उर्वरित रकमेची वजावट सदर काम वित्तीयदृष्टया ७५ टक्के पूर्ण होईपर्यंतच्या चालू देयकांमधून करण्यात येईल. तथापि ७५ टक्के काम पूर्ण होईपर्यंत सुरक्षा अनामत रकमेची पूर्ण रक्कम वसूल करण्यात येईल.

**(ब)** ज्याप्रकरणी ५० टक्क्याहून अधिक काम पूर्ण झाले आहे, अशा प्रकरणी चालू देयकांमधून वसूल करावयाच्या सुरक्षा अनामत रकमेची वजावट पूर्ण झालेली असल्यास ती रक्कम कंत्राटदारास प्रदान करुन या रकमेबाबत कंत्राटदाराकडून विनाशर्त बँक गॅरंटी (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) घेण्यात येईल.

**२.२) मात्र ज्या कंत्राटांमध्ये मुळ सुरक्षा अनामत (Security Deposit) निविदा रकमेच्या २ टक्क्यापेक्षा अधिक आहे, (RA Bill मधून वसूल करायची रक्कम निविदा रकमेच्या १% पेक्षा जास्त आहे.)**

**(अ)** <u>जर वजावट रक्कम निविदा रकमेच्या १% कमी वसूली झाली असेल</u>

(१) तर चालू देयकांमधून वसूल करावयाची रकमेची वजावट १ टक्क्यापर्यंत सीमित ठेवावी व उर्वरित चालू देयकामधून वसूल करावयाची रक्कम (निविदा प्रमाणे RA Bill मधून वसूल करावयाच्या मूळ रक्कमेतून १% वसूल करायची रक्कम वजा करुन) विनाशर्त बँक गॅरंटी (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) स्वरुपात घ्यावी.
(२) १% वजावट पूर्ण झाल्यावर ती रक्कम पण कंत्राटदारास विनाशर्त बँक गॅरेंटीच्या (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास मुक्त करावी.

**(ब)** <u>जर वजावट रक्कम निविदा रकमेच्या १% वर वसूली झाली असेल</u>

तर ती रक्कम कंत्राटदाराला एकूण वसूल करावयाची रकम (निविदा प्रमाणे RA Bill मधून वसूल करावयाची रक्कम) विनाशर्त बँक गॅरेंटीच्या (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास मुक्त करावी.

२.३) वरील सुविधा ज्या प्रकरणी दि.१५ मार्च, २०२० पूर्वी निविदा शर्तीचा अन्यथा भंग झाला नसेल, अशा रु.५० लक्ष पेक्षा अधिक रकमेच्या कंत्राटांना लागू राहतील.

३) ज्याप्रकरणी निविदा रकमेहून कमी रकमेचा देकार प्राप्त होतो म्हणून **अतिरिक्त सुरक्षा अनामत (Additional Security Deposit)** रक्कम बँक हमी/डी.डी. घेतली जाते, त्याप्रकरणी-

३.१) ज्या प्रकरणी ५० टक्क्याहून अधिक रकमेचे काम पूर्ण झाले आहे त्याप्रकरणी ५० टक्के अनामत रक्कम हमी/डी.डी. कंत्राटदारास परत करण्यात यावे. उर्वरित अनामत रक्कम डी.डी.च्या स्वरुपात असल्यास ती विनाशर्त बँक गॅरंटीच्या मोबदल्यात मुक्त करण्यात यावी.

३.२) ज्याप्रकरणी १०० टक्क्याहून अधिक रकमेचे काम पूर्ण झाले आहे, त्याप्रकरणी अंतिम देयक तातडीने अदा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम परत करण्याबाबत निविदा मधील शर्तीनुसार रक्कम कंत्राटदारास परत करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

३.३) वरील सुविधा ज्या प्रकरणी दि.१५ मार्च, २०२० पूर्वी निविदा शर्तींचा अन्यथा भंग झाला नसेल, अशा रु.५० लक्ष पेक्षा अधिक रकमेच्या कंत्राटांना लागू राहतील.

४) ज्या कंत्राटांमध्ये (उदाहरणार्थ, बांधा-वापरा-हस्तांतरीत करा, ई.पी.सी. मॉडेल) **कामगिरीसाठी अनामत रक्कम (Performance Security)** बँक हमीच्या स्वरुपात घेण्यात येते, अशा प्रकरणी-

४.१) ज्याप्रकरणी ५० टक्क्याहून अधिक रकमेचे काम पूर्ण झाले आहे, त्याप्रकरणी ज्या प्रमाणात काम पूर्ण झाले आहे त्याच्या ५० टक्के प्रमाणात अनामत रक्कम (हमीची रक्कम) कंत्राटदारास परत करण्यात यावी.

४.२) वरील सुविधा ज्या प्रकरणी दि.१५ मार्च, २०२० पूर्वी निविदा शर्तींचा अन्यथा भंग झाला नसेल, अशा रु.५०० लक्ष पेक्षा अधिक रकमेच्या कंत्राटांना लागू राहतील.

५. वर परिच्छेद १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या सवलतींचा लाभ घेण्यास इच्छुकता दर्शविल्यानंतर कंत्राटदारास दैवी आपत्ती ( Force Majeure Clause) संबंधातील कंत्राटातील अथवा सर्वसाधारण तरतूद लागू करण्याबाबत विनंती करता येणार नाही.

६. सदर मार्गदर्शक सूचना हया अंतरिम स्वरुपाच्या असून नवीन निविदा काढताना त्यांच्या अटी व शर्तींमध्ये या सूचनांचा आधार घेऊन बदल करण्यात येवू नयेत. तथापि यथास्थिती नवीन कंत्राटांनाही या सूचनांचा लाभ देण्यास हरकत नाही.

७. सदर मार्गदर्शक सूचना दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत अंमलात राहतील.

८. सदर मार्गदर्शक सूचना या राज्य शासनाच्या विभागामार्फत हाती घेण्यात आलेल्या प्रकल्प व कामांच्या कंत्राटांना लागु राहतील. सदर मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीसाठीचे अधिकार प्रशासकीय विभाग, कार्यकारी अभियंता/अधीक्षक अभियंता या दर्जाच्या अधिकाऱ्यांना प्रदान करतील, जेणेकरुन सदर प्रकरणी जलद कार्यवाही होईल.

९. शासकीय कंपन्या, शासकीय उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, निमशासकीय संस्था या सदर मार्गदर्शक सूचना योग्य त्या फेरफारांसह लागू करु शकतील.

१०. सदर प्रकरणी कोणतीही धोरणात्मक शंका अथवा अर्थविवरणाची बाब उद्भवल्यास त्याचे स्पष्टीकरण करण्यासाठी सचिव (व्यय), वित्त विभाग यांचे अध्यक्षतेखाली सचिव (बांधकामे) व सचिव (प्रकल्प समन्वयन) यांचा समावेश असलली समिती गठीत करण्यात येईल. या समितीचे सदस्य सचिव

म्हणून सहसचिव (व्यय-१२), वित्त विभाग हे राहतील. सदर समिती त्यांची शिफारस अंतिम निर्णयार्थ अपर मुख्य सचिव (वित्त) यांना सादर करील. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचा या संबंधीचा निर्णय अंतिम असेल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संगणक सांकेतांक २०२००७२९१८०९५९४८०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manoj Saunik

Digitally signed by Manoj Saunik
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f25a53a24b8d29e40821466854d96b314a8f72e7aed285522fcb6722abee3e2b, serialNumber=446051267064f6e7a79a97ad1d4d1a909ec8dc2504daa67ce24795e4626ad8ee, cn=Manoj Saunik
Date: 2020.07.29 17:44:35 +05'30'

**( मनोज सौनिक )**
**अपर मुख्य सचिव, वित्त विभाग**

**प्रत,**

१.मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
३. राज्यपालांचे सचिव
४. मुख्यमंत्र्यांचे सचिव
५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
७. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
८.प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
९. प्रधान महालेखापाल (लेखी परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, नागपूर
११. महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र नागपूर
१३.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१४.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१६.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२०. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदर, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२२. सर्व विभागीय आयुक्त
२३. सर्व जिल्हाधिकारी
२४.सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२७. महासंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
२८.संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई
२९. सह संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
३०.वित्त विभागातील सर्व कार्यासने
३१.निवड नस्ती व्यय-१२.

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादूर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणींसंदर्भात उपाययोजना व सहाय्य करणे

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन पुरकपत्र क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२०

**वाचा - शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२, दि. २९ जुलै, २०२०**

**शासन पुरकपत्र:**

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीसंदर्भात उपाययोजना व सहाय्य करण्याबाबत वित्त विभागाने निर्गमित केलेल्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये परिच्छेद क्र. १० मधील तरतूदीनुसार धोरणात्मक शंका अथवा अर्थविवरणाबाबत सचिव ( व्यय) वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली सचिव (बांधकामे) व सचिव (प्रकल्प समन्वय) यांचा समावेश असलेली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समिती त्यांची शिफारस अंतिम निर्णयार्थ अपर मुख्य सचिव (वित्त) यांना सादर करील. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचा या संबंधीचा निर्णय अंतिम असेल अशी तरतूद आहे.

२. सदर तरतूदीनुसार समितीने केलेल्या शिफारशीनुसार उक्त संदर्भाधीन शासनपरिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे व अधिकच्या सूचना प्रस्तुत करण्यात येत आहे.

**(अ)** उक्त शासन परिपत्रकातील परिच्छेद २ मधील अ.क्र.१ मध्ये **शासकीय कामाच्या पूर्णत्वासाठी मुदतवाढीची विनंती कंत्राटदाराने केल्यास त्यास, दि. १५ मार्च, २०२० ते दि. १५ सप्टेंबर, २०२० अशी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, या बाबत स्पष्ट करण्यात येते की, शासकीय कामाच्या पूर्णत्वासाठी मुदतवाढीची विनंती कंत्राटदाराने केल्यास त्या शासकीय पूर्णत्वासाठी कंत्राटातील नियमित व यापूर्वी शासन विभागाने मान्य केलेल्या मुदतवाढीपेक्षा सहा महिने पर्यंत मुदतवाढ देण्यात येईल.**

**(ब)** सदर शासन परिपत्रकातील परिच्छेद २.१ (अ) मधील दुसऱ्या व तिसऱ्या ओळीतील वाक्य " **७५ टक्के याऐवजी ९५ टक्के "** असे वाचण्यात यावे. तसेच

**(क)** सदर शासन परिपत्रकातील परिच्छेद २.१ (ब) मधील चौथ्या ओळीतील वाक्य "**दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत याऐवजी निविदेतील शर्तीत नमूद कालावधीपर्यंत "** असे वाचण्यात यावे.

**(ड)** तसेच उक्त शासन परिपत्रकातील परिच्छेद २ मधील अ.क्र.२.३ नंतर २.४ व २.५ खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

**(२.४)** निधी अभावी प्रलंबित देयकांची रक्कम सुरक्षा ठेव रकमेपेक्षा जास्त असल्यास अशा प्रकरणी तशी नोंद देयकांमध्ये करण्यात यावी. कंत्राटदारास सुरक्षा अनामत परत करावी व त्यांच्या प्रलंबित देयकांमध्ये सुरक्षा अनामत इतक्या रकमेचा हिशोब ठेवावा व निधी प्राप्त झाल्यावर सुरक्षा ठेव रकमेची भरपाई शासनाकडे / विभागाकडे करण्यात यावी.

**(२.५)** पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने त्यांच्या कामांच्या निविदा तरतूदींना बाधा न येता अनामत रकमा परत करण्यासंबंधीची कार्यवाही करावी.

**(इ)** तसेच उक्त शासन परिपत्रकातील परिच्छेद ३ मधील अनुक्रमांक ३.३ नंतर ३.४ खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

**(३.४)** सदर अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम (Additional Performance Security Deposit) १०० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर दोष दायित्व कालावधी पूर्ण होण्याची वाट न पहाता, परत करण्यात यावी.

सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संगणक सांकेतांक २०२०१०१४१३३९२७९६०५ असा आहे. हे शासन पुरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIVEK RAMBHAJI DAHIPHALE

Digitally signed by VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, serialNumber=3981a50612646983d580dea2da5fb52a33d8e6e3c4f34cd80f08c598711ceb65, cn=VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
Date: 2020.10.14 13:43:12 +05'30'

**( वि. र. दहिफळे )**

**सहसचिव (व्यय), वित्त विभाग**

**प्रत,**

०१.मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

०२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.

०३. राज्यपालांचे सचिव

०४. मुख्यमंत्र्यांचे सचिव

०५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

०६. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

०७. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख

०८.प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई

०९. प्रधान महालेखापाल (लेखी परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई

१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, नागपूर

११. महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर

१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र नागपूर

१३.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२

१४.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१

१५.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई

१६.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई

१७. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई

२०. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदर, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली

२२. सर्व विभागीय आयुक्त

२३. सर्व जिल्हाधिकारी

२४.सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

२५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई

२६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

२७. महासंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती

२८.संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई

२९. सह संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती

३०.वित्त विभागातील सर्व कार्यासने

३१.निवड नस्ती व्यय-१२.

तात्काळ / अर्थसंकल्प प्राथम्य

**कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामध्ये सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परीणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्याबाबत (शुध्दीपत्रक-९).**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : - ०१ डिसेंबर, २०२०

वाचा :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.६४/अर्थ-३, दि. १६ एप्रिल, २०२०.
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अर्थसं २०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.०४ मे,२०२०,
३) वित्त विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. अर्थसं २०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.१४ मे,२०२० (शुध्दीपत्रक-१),
४) वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. अर्थसं २०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.१६ जून, २०२० (शुद्धीपत्रक-२),
५) वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. अर्थसं २०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.१४ जुले, २०२० (शुद्धीपत्रक-३),
६) वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. अर्थसं २०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.३० जुलै, २०२० (शुद्धीपत्रक-४),
७) वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. अर्थसं २०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.०५ ऑगस्ट, २०२० (शुद्धीपत्रक-५),
८) वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. अर्थसं २०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.१४ ऑगस्ट, २०२० (शुद्धीपत्रक-६).
९) वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. अर्थसं २०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि. १६ सप्टेंबर, २०२० (शुद्धीपत्रक-७).
१०) वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. अर्थसं २०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि. १७ सप्टेंबर, २०२० (शुद्धीपत्रक-८).
११) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०२०/प्र.क्र.६४/अर्थ-३, दि. १० नोव्हेंबर, २०२०.

**शासन निर्णय शुध्दीपत्रक -**

दिनांक ०४.०५.२०२० च्या शासन निर्णयातील परिच्छेद १३ मध्ये दि. १४ जुलै, २०२० च्या शासन शुध्दीपत्रक क्र.३ अन्वये अंतर्भुत करण्यात आलेल्या परिच्छेदानंतर पुढील परिच्छेदाचा समावेश करण्यात यावा.

"राज्याच्या अर्थचक्रास चालना देण्यासाठी राजकोषिय उपाययोजना करण्यासंदर्भात संदर्भाधीन दिनांक १०.११.२०२० च्या शासन परिपत्रकान्वये ज्या विभागांमार्फत मत्ता निर्मिती व पर्यायाने रोजगार निर्मितीस चालना देण्यास भांडवली खर्च केला जातो अशा बाबींसाठी सदर शासन परिपत्रकासोबतच्या परिशिष्टात नमूद भांडवली लेखाशिर्षाअंतर्गतचा सन २०२०-२१ साठीचा अर्थसंकल्पीत निधी ७५ टक्केच्या मर्यादेत वितरीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या ७५ टक्के निधीमधील ५० टक्के निधीतून प्रथमत: प्राधान्याने प्रलंबित देयके अदा केल्यानंतर उर्वरित निधी सुरु असलेली अपुर्ण बांधकामे / मत्ता निर्मितीची कामे यासाठी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच ७५ टक्के निधीमधील उर्वरित २५ टक्के निधीच्या मर्यादेत नव्याने अर्थसंकल्पीत करावयाची बांधकामे / मत्ता निर्मितीची कामे हाती घेता येतील (तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, निविदा, कार्यारंभ आदेश देता येतील).

याव्यतिरिक्त आमदार स्थानिक विकास कार्यक्रम व जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण / अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती घटक कार्यक्रम) याबाबतचा १०० टक्के निधी वितरीत करण्यास संदर्भाधीन दिनांक १०.११.२०२० च्या शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आलेली असल्याने या कार्यक्रमांतर्गत प्रलंबित दायित्व विचारात घेऊन नवीन बांधकामे / मत्ता निर्मितीची कामे हाती घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. ”

सदर शासन शासन निर्णय शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२०१२०११३०१०३५३०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vasant K. Patil

Digitally signed by Vasant K. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=56462e610dbf070fe5eefa98886b167556f80b373181ed680e4c9c879d7e3617, serialNumber=14caf70544d4d2fb25d1da6ed673b0488e940d807179c09470fcdd9192ba4ce7, cn=Vasant K. Patil
Date: 2020.12.01 13:07:19 +05'30'

**( व. कृ. पाटील )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव.
२) मा मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३) मा. विरोधी पक्षनेता, (विधानपरिषद / विधानसभा), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
४) सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७) सह सचिव / उप सचिव (अर्थसंकल्प शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली-११०००१.
९) प्रधान महालेखापाल-१/२, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
१०) प्रधान महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
११) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१५) सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) निवड नस्ती, अर्थसंकल्प-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादूर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणींसंदर्भात उपाययोजना व सहाय्य करणे

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन पुरकपत्र क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २१ जानेवारी, २०२१

वाचा - (१) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२, दि. २९ जुलै, २०२०

(२) शासन पुरकपत्र क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२, दि. १४ ऑक्टोबर, २०२०

(३) शासन पुरकपत्र क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२, दि. १ डिसेंबर, २०२०

शासन पुरकपत्र :

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीसंदर्भात उपाययोजना व सहाय्य करण्याबाबत वित्त विभागाने निर्गमित केलेल्या संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये परिच्छेद क्र. १० मधील तरतूदीनुसार धोरणात्मक शंका अथवा अर्थविवरणाबाबत सचिव ( व्यय) वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली सचिव (बांधकामे) व सचिव (प्रकल्प समन्वय) यांचा समावेश असलेली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समिती त्यांची शिफारस अंतिम निर्णयार्थ अपर मुख्य सचिव (वित्त) यांना सादर करील. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचा या संबंधीचा निर्णय अंतिम असेल अशी तरतूद आहे.

२. सदर तरतूदीनुसार समितीने केलेल्या शिफारशीनुसार संदर्भाधीन क्रमांक १ मधील निर्णयातील परिच्छेद क्र. २(२.२) मधील मुद्दा क्र. (अ) व (ब) नंतर खालील प्रमाणे मुद्दा क्र. (क) अंतर्भुत करुन ते पुढील प्रमाणे वाचावे ---

(क) **ज्या प्रकरणी ५०% हून अधिक काम पूर्ण झाले आहे, त्या प्रकरणी एकूण झालेल्या कामाच्या प्रमाणाच्या ५०% अनामत रक्कम कंत्राटदारास ज्या स्वरुपात अनामत रक्कम जमा असेल, ( बँक गॅरंटी अथवा रोख रक्कम ) त्यास्वरुपात परत करण्यात यावी. ( परंतु असे करत असताना सुरक्षा अनामत / Security Deposit २% पेक्षा कमी होणार नाही याची खबरदारी घ्यावी.)**

**उदा. समजा एक काम ज्याची अनामत रक्कम ४% आहे व काम ६०% पूर्ण झाले आहे अशा प्रकरणी कंत्राटदारास खालील प्रमाणे अनामत रक्कम परत करण्यात यावी.**

**४% अनामत रक्कमेतून ६०% काम पूर्ण झाल्यामुळे = ( ४% X ६०% / २ ) = १.२% एवढी अनामत रक्कम कंत्राटदारास परत करण्यात येईल व २.८% एवढी अनामत रक्कम ठेऊन घेण्यात येईल.**

सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संगणक सांकेतांक २०२१०१२११५३४४८४६०५ असा आहे. हे शासन पूरकपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMBHAJI DAHIPHALE

Digitally signed by VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, serialNumber=3981a50612646983d580dea2da5fb52a33d8e6e3c4f34cd80f08c598711ceb65, cn=VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
Date: 2021.01.21 15:38:22 +05'30'

**( वि. रं. दहिफळे )**

**सहसचिव (व्यय), वित्त विभाग**

**प्रत,**

०१.मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
०२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
०३. राज्यपालांचे सचिव
०४. मुख्यमंत्र्यांचे सचिव
०५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
०६. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
०७. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
०८.प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
०९. प्रधान महालेखापाल (लेखी परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, नागपूर
११. महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र नागपूर
१३.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१४.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१६.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२०. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदर, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२२. सर्व विभागीय आयुक्त
२३. सर्व जिल्हाधिकारी
२४.सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२७. महासंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
२८.संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई
२९. सह संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
३०.वित्त विभागातील सर्व कार्यासने
३१.निवड नस्ती व्यय-१२.